# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**प्रस्तावना** :- मौजा-सोमलवाडा येथील खापरी अजनी स्टेशन दरम्यानच्या
{**प्रकल्प विभाग-१** } रेल्वे लाईन खालून मनिष नगर कडे जाणारा सोमलवाडा अंडरपास (RUB) पुलाचे बांधकामाबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग (राज्यस्तर), विभागीय रेल्वे मॅनेजर (DRM-Works) मध्य रेल्वे, महा. मेट्रो-रेल कॉर्पोरेशन तथा महानगरपालिका, नागपूर यांचे मध्ये बांधकाम पूर्व करारनामा साक्षांकित करणेबाबतचा प्रश्न विचारात घेणे.

**टिप** :-

1. उक्त सोमलवाडा अंडरपास (RUB) पुलाचे हस्तांतरण करुन घेण्याबाबत व महामेट्रो/ रेल्वे/ सार्वजनिक बांधकाम यांचे मध्ये करण्यात आलेला बांधकाम पूर्व करारनामा सांक्षाकित करण्याबाबत मा. आयुक्त तथा प्रशासक महोदय यांचेद्वारे दि. 15/09/2025 रोजी मंजूरी प्रदान करण्यात आलेली आहे.
२. विस्तृत टिप्पणी व बांधकाम करारनामा (छायांकित प्रतीत) नस्तीत संलग्न आहे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक** :- 46/**मनपा/प्रशासक** **दिनांक** :- 23/09/2025

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता (प्रकल्प-१), प्रकल्प विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार मौजा-सोमलवाडा येथील खापरी अजनी स्टेशन दरम्यानच्या रेल्वे लाईन खालून मनिष नगर कडे जाणारा सोमलवाडा अंडरपास (RUB) पुलाचे बांधकामाबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग (राज्यस्तर), विभागीय रेल्वे मॅनेजर (DRM-Works) मध्य रेल्वे, महा. मेट्रो-रेल कॉर्पोरेशन तथा महानगरपालिका, नागपूर यांचे मध्ये बांधकाम पूर्व करारनामा साक्षांकित करणेबाबतचा प्रश्न विचारात घेणे.